महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : १९५ वा | दिनांक : २३/०५/२०२५ | वार : शुक्रवार

## अर्जुन खोतकरांसाठी १५ कोटी गोळा झाले हे सांगण्यासाठी ब्रह्मदेवाची गरज नाही - राऊत



**मुंबई :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी धुळ्यातील विश्रामगृहात सापडलेली रोकड विधिमंडळाच्या अंदाज समितीचे अध्यक्ष अर्जुन खोतकर यांच्यासाठी गोळा झाल्याचा आरोप केला आहे. महाराष्ट्र सध्या भ्रष्टाचाराच्या चिखलात गटांगळ्या खात आहे. अर्जुन खोतकरांनी धुळ्याच्या विश्रामगृहात १५ कोटी रुपये गोळा केले हे सांगण्यासाठी ब्रह्मदेवाची गरज नाही. त्यांच्यावर गुन्हा दाखल झाला पाहिजे. ही ईडीची केस आहे, असे ते म्हणालेत. संजय राऊत यांच्या या आरोपांमुळे राज्याचे राजकारण चांगलेच तापले आहे.

संजय राऊत गुरुवारी सकाळी पत्रकारांशी बोलताना म्हणाले की, विधिमंडळाची अंदाज समिती ही शासनाची जी कामे होतात, ती योग्य प्रकारे नियमानुसार झालीत की नाहीत याचा तपास करते. त्यासंबंधीचे साक्षी पुरावे तपासते. पण ही समिती किती भ्रष्ट आहे, विशेषतः या समितीचे अध्यक्ष अर्जुन खोतकर किती भ्रष्ट आहेत हे आता समोर आले आहे. खोतकर पूर्वी आमच्याकडेच होते. ते निष्ठेच्या आणा-भाका फार खायचे. एकनाथ शिंदे पळून गेले तेव्हा ते त्यांना उंदीर म्हणाले होते. पण त्यानंतर ते स्वतःच ईडीला घाबरून शिंदे गटात गेले. त्यानंतर त्यांना अंदाज समितीचे अध्यक्षपद भ्रष्टाचार करण्यासाठी दिले.

ते पुढे म्हणाले, धुळे विश्रामगृहाच्या १०२ क्रमांकाच्या खोलीत मागील ३ दिवसांत ५ कोटी रुपयांची कॅश जमा झाली होती. विधिमंडळाची अंदाज समिती, तिचे अध्यक्ष अशा प्रकारच्या कामांच्या तपासणीसाठी धुळ्याच्या दौऱ्यावर होते. तेथील ठेकेदारांनी आपला भ्रष्टाचार लपवण्यासाठी या अंदाज समितीच्या अध्यक्षांना १५ कोटींची रक्कम गोळा करून देण्याची जबाबदारी घेतली होती. त्यासाठी त्यांनी अंदाज समितीच्या चेअरमनच्या पाटील नामक पीएची नियुक्ती केली. त्यानुसार विश्रामगृहाच्या १०२ क्रमांकाच्या खोलीत मागील ३ दिवसांपासून ही रक्कम जमा होत होती.

अंदाज समितीच्या अध्यक्षांना १५ कोटी रुपये देण्याचा सौदा झाला होता. साडेपाच कोटी रुपये जमा झाले होते. उर्वरित १० कोटी पुढील २ दिवसांत जमा होणार होते, हे मी फार जबाबदारीने सांगत आहे. हे पैसे मिळाले नाही तर सर्वच ठेकेदारांना ब्लॅक लिस्टमध्ये टाकण्याची धमकी खोतकरांनी दिली होती. त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्याची शिफारस मी करेन असे ते म्हणाले होते, असे संजय राऊत म्हणाले.

ते पुढे म्हणाले, हे राज्य कुठे जात आहे? आमचे स्थानिक आमदार अनिल गोटे व शिवसैनिकांच्या कानावर ही गोष्ट गेली. त्यांनी शिवसैनिकांसह विश्रामगृहावर धडक मारली. तेव्हा १०२ मधील लोकांनी घाईघाईने टाळे लावून पळून गेले. आमची अशी मागणी होती की, जिल्हाधिकारी, एसपी व भ्रष्टाचार प्रतिबंधक विभागाच्या प्रमुखांनी ही खोली उघडून त्याचा पंचनामा करावा. त्यानंतर संबंधित लोकांवर कारवाई करावी. त्यासाठी गोटे तिथे अनेक तास ठिय्या मांडून बसले. पण त्यानंतरही कोणताही अधिकारी तिथे फिरकला नाही. अखेर शिवसैनिकांचा दबाव वाढल्यानंतर ते आले. त्यांनी टाळे घडले. त्यानंतर आतापर्यंत पैशांची मोजणी सुरू आहे. या प्रकरणातील इतर लोक फरार आहेत. आता फक्त अंदाज समितीचे अध्यक्ष फरार झालेत का? हे पहावे लागेल. आता सर्वजण काखा वर करतील. तो मी नव्हेच अशी भूमिका घेतील. पण हे १५ कोटी रुपये शिंदे गटाच्या जालन्याचे आमदार अर्जुन खोतकर यांना देण्यासाठीच जमा झाले होते हे सांगण्यासाठी आता ब्रह्मदेवाची गरज नाही. त्यांना वाचवण्याचे प्रयत्न सुरू आहेत. खरे म्हणजे ज्यांच्या नावावर ही खोली होती, त्यांच्यावर गुन्हा दाखल करून हे संपूर्ण प्रकरण ईडी व सीबीआयकडे देण्याची गरज आहे. मागील वर्षभरात व त्यापूर्वीच्या अडीच वर्षांत अंदाज समितीच्या कशा कशा कुठे बैठका झाल्या, आणि या पद्धतीने या पद्धतीने पैसे कसे जमा झाले, आतापर्यंत अंदाज समितीच्या अध्यक्षांनी १०० कोटींच्या वर पैसे जमा केल्याची माहिती माझ्याकडे आहे.

संजय राऊत यांनी यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावरही हल्ला चढवला. ते म्हणाले, देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे यांच्या काळातील हे आमचे राज्य आहे. अर्थमंत्री अजित पवारांच्या काळातील आपल्या महाराष्ट्राची ही अवस्था आहे. अंदाज समितीचे अध्यक्ष पैसे गोळा करतात. गुन्ह्याचे ठिकाण सरकारी जागा, काय करत आहेत गृहमंत्री फडणवीस? त्यांच्या गृहखात्याच्या अंतर्गतच लाचलुचत प्रतिबंधक विभाग आहे. ते हा विभाग फक्त आपल्या राजकीय विरोधकांविरोधातच वापरणार का? इतरांचे काय? अर्जुन खोतकरांचे काय? त्यांना अटक करा. त्यांच्यावर गुन्हा दाखल करा. तुम्ही सच्चे असाल, तर या प्रकरणात गुन्हा दाखल होण्याची गरज आहे. तुम्ही स्वतः भ्रष्टाचाराने सडलेले असल्यामुळे तुम्हाला या गोष्टी दिसत नाहीत. तुम्ही भ्रष्टाचाऱ्यांना वाचवत आहात. कारण तुमचे सरकार या भ्रष्टाचाराच्या दलदलीतून निर्माण झाले.

## वक्फ कायदा- सुनावणी पूर्ण, सर्वोच्च न्यायालयाने निर्णय राखून ठेवला



**नवी दिल्ली :** वक्फ (दुरुस्ती) कायद्याच्या वैधतेला आव्हान देणाऱ्या याचिकांवर सर्वोच्च न्यायालयात तीन दिवसांची सुनावणी गुरुवारी संपली. सरन्यायाधीश बीआर गवई आणि न्यायमूर्ती ऑगस्टीन जॉर्ज मसीह यांच्या खंडपीठाने सरकार आणि मुस्लिम बाजूचा युक्तिवाद ऐकल्यानंतर निर्णय राखून ठेवला आहे.

त्याआधीच्या सुनावणीदरम्यान, याचिकाकर्त्यांकडून बाजू मांडणारे वकील कपिल सिब्बल म्हणाले की, एकदा वक्फच्या स्थितीबाबत चौकशी सुरू झाली की, अहवाल येईपर्यंत वक्फची स्थिती रद्द केली जाते.

देशात २०० वर्षांहून अधिक जुन्या अनेक स्मशानभूमी आहेत. २०० वर्षांनंतर सरकार म्हणेल की ही माझी जमीन आहे आणि स्मशानभूमीची जमीन अशा प्रकारे हिसकावून घेता येईल का?

यावर सरन्यायाधीश म्हणाले, मग जमिनीची नोंदणी का झाली नाही. यावर कपिल सिब्बल म्हणाले, त्यांनी (मुस्लिम समुदायाने) नोंदणी केली नाही, कारण ती राज्याची जबाबदारी होती, आता ते म्हणतात की त्यांनी नोंदणी केली नाही, ही समुदायाची चूक आहे. जर तुमच्याकडे सत्ता असेल तर तुम्ही स्वतःच्या चुकीचा फायदा घेऊ शकत नाही.

एक दिवस आधी, २१ मे (बुधवार) रोजी झालेल्या सुनावणीदरम्यान, केंद्राच्या वतीने सॉलिसिटर जनरल (एसजी) तुषार मेहता यांनी न्यायालयाला सांगितले होते की, सरकारी जमिनीवर कोणालाही कोणताही अधिकार असू शकत नाही, जरी तो 'वापरकर्त्याद्वारे वक्फ' च्या आधारावर असला तरीही.

एसजी तुषार मेहता म्हणाले की, अनुसूचित क्षेत्रात अनुसूचित जमातींना संवैधानिक संरक्षण मिळते. समजा मी जमीन विकतो आणि असे आढळून येते की अनुसूचित जमातीतील एका व्यक्तीची जमीन व्यवहारात फसवणूक झाली आहे. म्हणून जमीन परत देता येते पण वक्फ म्हणतो की दान केलेली जमीन परत घेता येत नाही.

एसजी मेहता म्हणाले की, जेपीसीने म्हटले आहे की अनुसूचित क्षेत्रातील एसटी समुदायाचे लोक इतरत्र जसे इस्लामचे पालन करतात तसे ते करत नाहीत कारण त्यांची एक वेगळी सांस्कृतिक ओळख आहे. यावर न्यायमूर्ती मसीह म्हणाले की, तुम्ही असे कसे म्हणू शकता, इस्लाम धर्म सर्वत्र सारखाच आहे. तथापि, सांस्कृतिक पद्धती वेगवेगळ्या असू शकतात.



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com


छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २३ मे २०२५


## सिंदखेड राजा तालुक्यात वाळू माफियांवर महसूल विभागाची मोठी कारवाई



**सिंदखेडराजा (महेश मुंढे)** : याबाबत सविस्तर वृत्त असे की सिंदखेडराजा तालुक्यामध्ये महसूल विभागाने मोठी कारवाई करत 400 ब्रास अवैध वाळूचा साठा जप्त केला यामुळे वाळू वाहतूक करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहे, जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, उपविभागीय अधिकारी डॉ. प्रा. संजय खडसे आणि तहसीलदार अजय दिवटे यांच्या उपस्थितीत अवैध वाळूचा साठा जप्त करण्यात आला व जागेवरच या वाळूचा लिलाव करून तालुक्यातील नागरिकांच्या घरकुलाचे कामे सुरू आहेत त्यांना जप्त करण्यात आलेली वाळू देण्यात आली आहे त्यामुळे घरकुल बांधकाम करणाऱ्या गरीब नागरिकांचा फायदा झाला आहे. जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी स्वतः खडकपूर्णा नदीच्या पात्रात जाऊन पाहणी केली तसेच तालुक्यातील साठेगाव, निमगाव वायाळ, हिवरखेड पूर्णा, निमगाव गुरु, किनगाव राजा या गावांना अचानक भेटी दिल्या या दरम्यान ज्या ठिकाणी वाळूचा साठा आढळून आला ते सर्व वाळू साठे जप्त करून ज्या भागातून वाळू उत्खनन झालेले आहे त्या भागातील अवैध्य वाळू साठा करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याचे तलाठी यांना आदेशित केले. खडकपूर्णा नदीच्या काठावरून अवैध्य वाळू वाहतूक करण्यासाठी वापरत असलेले रस्ते खोदून पूर्णपणे बंद करण्यात आले आहे, निमगाव वायाळ, हिवरखेड पूर्णा, किनगाव राजा,साठेगाव, तढेगाव या गावांमध्ये अवैध्य वाळू साठे जप्त करण्यात आले त्यावेळी जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, उपविभागीय अधिकारी प्रा. संजय खडसे, तहसीलदार अजय दीवटे, तहसीलदार सायली जाधव, मोटार वाहन उपनिरीक्षक राजश्री चौधरी यांच्यासह परिवहन विभाग महसूल प्रशासनाचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. प्रशासनाने केलेल्या कारवाईचे नागरिकांमधून भरभरून कौतुक केले जात आहे.

## सत्यपाल मलिक यांच्यावर जम्मू-काश्मीरच्या किरू जलविद्युत प्रकल्पात 2200 कोटींच्या फसवणुकीचा आरोप



**नवी दिल्ली** : जम्मू-काश्मीरमधील किरू जलविद्युत प्रकल्पाशी संबंधित भ्रष्टाचार प्रकरणात केंद्रीय अन्वेषण विभागाने (CBI) गुरुवारी जम्मू-काश्मीरचे माजी राज्यपाल सत्यपाल मलिक यांच्यासह सहा जणांविरुद्ध आरोपपत्र दाखल केले. हे प्रकरण सुमारे २,२०० कोटी रुपयांच्या सिव्हिल वर्क कॉन्ट्रॅक्टमधील अनियमिततेशी संबंधित आहे.

याच प्रकरणासंदर्भात सीबीआयने २२ फेब्रुवारी २०२४ रोजी सत्यपाल मलिक यांच्या ठिकाणांवर छापा टाकला होता. दिल्लीतील इतर २९ ठिकाणीही छापे टाकण्यात आले.

वास्तविक, सत्यपाल मलिक यांनी १७ ऑक्टोबर २०२१ रोजी सांगितले होते की, जम्मू आणि काश्मीरचे राज्यपाल असताना त्यांना ३०० कोटी रुपयांची लाच देण्यात आली होती. पण त्यांनी ती नाकारली.

यानंतर, जम्मू आणि काश्मीर सरकारच्या आदेशानुसार सीबीआयने एप्रिल २०२२ मध्ये गुन्हा दाखल केला. मलिक ऑगस्ट २०१८ ते ऑक्टोबर २०१९ पर्यंत जम्मू आणि काश्मीरचे राज्यपाल होते.

आरोपपत्र दाखल झाल्यानंतर, सत्यपाल मलिक यांनी सोशल मीडियावर सांगितले की त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे आणि ते कोणाशीही बोलण्याच्या स्थितीत नाहीत. त्यांनी लिहिले की त्यांना हितचिंतकांचे फोन येत आहेत, पण ते त्यांना उत्तर देऊ शकत नाहीत.

गेल्या वर्षी सीबीआयच्या छाप्यानंतर मलिक म्हणाले होते की, "सीबीआयने माझ्या घरावर छापा टाकला, पण ज्या लोकांविरुद्ध मी भ्रष्टाचाराची तक्रार केली होती त्यांची चौकशी झाली नाही. त्यांना माझ्याकडे फक्त ४-५ कुर्ता-पायजामा सापडतील. मी एका शेतकऱ्याचा मुलगा आहे, मी घाबरणार नाही."

सत्यपाल मलिक यांनी १७ ऑक्टोबर २०२१ रोजी राजस्थानमधील झुंझुनू येथील एका कार्यक्रमात म्हटले होते की, जम्मू आणि काश्मीरचे राज्यपाल असताना त्यांना कोट्यवधींची लाच देण्यात आली होती. त्या दरम्यान त्यांच्याकडे दोन फाईल्स आल्या. यापैकी एक मोठ्या उद्योगपतीची होती आणि दुसरी मेहबूबा मुफ्ती आणि भाजपच्या युती सरकारमध्ये मंत्री असलेल्या व्यक्तीची होती. मलिक म्हणाले होते की, त्यांच्या सचिवांनी त्यांना सांगितले की त्यात घोटाळा झाला आहे, त्यानंतर त्यांनी दोन्ही करार रद्द केले.

मलिक यांनी असेही म्हटले होते की, त्यांना दोन्ही फाईल्ससाठी प्रत्येकी १५० कोटी रुपयांची ऑफर देण्यात आली होती. मलिक म्हणाले, 'मी सांगितले होते की मी पाच कुर्ता-पायजामा घेऊन आलो आहे आणि येथून फक्त तेच घेऊन जाईन.' जेव्हा सीबीआय विचारेल तेव्हा मी तुम्हाला ऑफर देणाऱ्यांची नावे देखील सांगेन.

या प्रकरणात सीबीआयने २ एफआयआर नोंदवले होते. पहिला एफआयआर सुमारे ६० कोटी रुपयांच्या कंत्राटांच्या वाटपात झालेल्या कथित भ्रष्टाचाराशी संबंधित आहे. २०१७-१८ मध्ये जम्मू आणि काश्मीर कर्मचारी आरोग्य सेवा विमा योजनेचा ठेका देण्यासाठी एका विमा कंपनीकडून लाच म्हणून ही रक्कम घेण्यात आली होती.

दुसरा एफआयआर २०१९ मध्ये किरू जलविद्युत प्रकल्पाच्या (एचईपी) बांधकामासाठी २,२०० कोटी रुपयांचे कंत्राट एका खासगी कंपनीला देण्यात आलेल्या भ्रष्टाचाराशी संबंधित आहे. सीबीआय या दोन्ही प्रकरणांची चौकशी करत आहे.


१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा) विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी

D.M.L.T

Diploma In Medical Laboratory Technology

- महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
- सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
- शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
- हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला ॲडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २३ मे २०२५


## छगनराव भुजबळ यांची कॅबीनेट मंत्री पदी निवड झाल्याबद्दल नागरिकांचा जल्लोश




**पडेगाव : (प्रा. शिवाजी गायकवाड)** राष्ट्रीय ओबीसी नेते व राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे ज्येष्ठ नेते तथा संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष महात्मा फुले समता परिषद श्री. छगनरावजी भुजबळ यांची महाराष्ट्र राज्याच्या कॅबिनेट मंत्री पदी निवड झाल्याबद्दल महात्मा फुले व सावित्रीमाई फुले यांच्या स्मारकस अभिवादन करून व ढोल ताशाचा गजर व फटाके फोडुन तसेच पेढे वाटून जल्लोष साजरा करण्यात आला यावेळी फुलचंद तुपे, मनिष मामा मालकर , कारभारी भुजबळ, गोकुळ भुजबळ, सिताराम बाबा मगर, संतोष शिंदे, आशोक महाजन, अरूण जाधव, आतुल शिंदे, आशोक डोके, अंकुश मगर, सावता वाझे, सूर्यभान पवार, आरविंद धिवर, राहुल निकम, सुमित कल्याणकर, नागेश हिवाळे, सुरेश भुजबळ, मालकर, गोपी तुपे, शाम पेहरकर, अक्षय पेहरकर, आकाश निळे, नागेश पेहरकर, शाम मगर, दीपक शेळके एजाज मामु आशोक जाधव आदी उपस्थित होते. राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शहर उपाध्यक्ष चंद्रकांत पेहरकर यांनी आयोजन केले होते.

## माओवाद शेवटच्या घटका मोजतोय - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



**नागपूर :** माओवाद्यांचा देशातील मोठा नेता बसव राजूचा भारतीय जवानांनी खात्मा केला आहे. यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे. नागपूर येथे पत्रकारांशी बोलताना त्यांनी अनेक विषयांवर भाष्य केले आहे. तसेच महाराष्ट्रात देखील अनेक माओवाद्यांनी आत्मसमर्पण केले असल्याची माहिती फडणवीस यांनी दिली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, माओवाद्यांचा जो देशातला नेता आहे बसव राजू याचे जे आपले सुरक्षा फोर्सेस आहेत त्यांनी त्याचा खात्मा केला आहे. हा असा व्यक्ती आहे ज्याने चंद्राबाबू नायडू यांच्यावरचा हल्ला असेल, छत्तीसगडमध्ये अनेक मंत्री मारले गेले तो हल्ला असेल, ४५ आपले सीआरपीएफ जवान असतील त्यांच्यावरचा हल्ला असेल अशा प्रकारचे या ठिकाणी माओवादी मारले गेले आहेत. महाराष्ट्रात देखील अत्यंत महत्त्वाचे माओवादी आत्मसमर्पण झाले आहे. २० पेक्षा जास्त माओवाद्यांनी आत्मसमर्पण केले आहे. मी असे म्हणेल की आता माओवाद हा शेवटच्या घटका मोजत आहे.

सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयावर बोलताना मुख्यमंत्री म्हणाले, सर्वोच्च न्यायालयाचे मनापासून आभार मानतो. गेल्या ४५ वर्षापासून विदर्भचा जो लढा चालला होता त्याला अत्यंत महत्त्वपूर्ण निर्णयाच्या माध्यमातून दिलासा देण्याचे काम माननीय सर्वोच्च न्यायालयाने केले आहे. ज्यावेळी महाराष्ट्र तयार झाला आणि विदर्भ हा मध्य भारतापासून किंवा सिपेन बिरारपासून वेगळा होऊन त्यावेळी महाराष्ट्रामध्ये दाखल झाला, त्यावेळच्या रेवेन्यू रेकॉर्डमध्ये या सगळ्या जमिनी झुडपी जंगल अशा प्रकारे लिहिण्यात आल्या, मध्य प्रदेशने आपले रेकॉर्ड दुरुस्त केल्या. महाराष्ट्राने झुडपी जंगल असा केल्यामुळे १९८० साली जो कायदा आला त्या कायद्यान्वये याला जंगलाचा दर्जा मिळाला. त्यामुळे विदर्भाचा विकास थांबला होता.

मी सांगू इच्छितो की नागपूर रेल्वे स्टेशनची बिल्डिंग असेल, हाय कोर्टाची बिल्डिंग असेल अशा अनेक बिल्डिंग यांचा जुना रेकॉर्ड पहिला तर झुडपी जंगलांच्या जागांवर आहेत. आणि म्हणून ४५ वर्ष मागणी होत होती की यातून काही न काही दिलासा मिळाला पाहिजे. विदर्भातले सिंचनाचे प्रकल्प, विकासाचे प्रकल्प हे सगळे मोठ्या प्रमाणात अडले होते. आज माननीय सर्वोच्च न्यायालयाने या संदर्भात निर्णय दिला आहे. १९९६ पूर्वी ज्या जमिनी ग्रँट झाल्या आहेत त्याला एक प्रकारे एक्झेमशन मिळाले आहे. राज्य सरकार या जमिनी केंद्र सरकारकडून मागू शकते आणि सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे आमची जी मागणी होती झोपडपट्ट्या ज्या आहेत यांना मालकी हक्काचे पट्टे देण्यासाठी एक्झेमशन देण्यात यावे, त्याला देखील मान्यता सर्वोच्च न्यायालयाने दिले आहे.

२०१४ ते २०१९ मी ज्यावेळी मुख्यमंत्री होतो त्यावेळी आपण या संदर्भात एक समिती नेमली होती. सर्वोच्च न्यायालयाला रीपोर्ट दिला होता आणि जवळजवळ त्यांनी हा रीपोर्ट मान्य करण्यात आला आहे. याचा फायदा विदर्भला होणार आहे. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाचे आभार मानतो. विकास आणि त्याचसोबत पर्यावरण या दोघांचे साधर्म्य साधण्याचे काम सर्वोच्च न्यायालयाने केले आहे.

## संजय राठोडांच्या विभागात पैसे घेऊन अधिकाऱ्यांची नियुक्ती

**मुंबई :** सध्या राज्यात सत्ताधारी असलेल्या महायुती सरकारमधील मृद व जलसंधारण विभागाचे मंत्री संजय राठोड पुन्हा एकदा वादाच्या भोवऱ्यात सापडले आहेत. विशेष म्हणजे, यावेळी आरोप कुठल्याही विरोधी पक्षाकडून नव्हे, तर थेट त्यांच्या सत्ताधारी महायुतीतील घटक पक्ष असलेल्या भाजपच्या आमदाराकडून करण्यात आला आहे. भाजपचे आमदार संदीप जोशी यांनी गंभीर स्वरूपाचे आरोप करत, त्यांच्या मृद व जलसंधारण खात्यात पैशांच्या पैसे घेऊन अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आल्याचा दावा संदीप जोशी यांनी केला आहे.

या आरोपामुळे संपूर्ण राजकीय वर्तुळात खळबळ माजली असून, सत्ताधाऱ्यांमध्येच निर्माण झालेल्या या अंतर्गत संघर्षामुळे महायुती सरकारची गोची होण्याची शक्यता आहे. संदीप जोशी यांनी या प्रकरणाबाबत थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहिले असून, या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी केली आहे.

संदीप जोशी यांनी सांगितले की, मृद व जलसंधारण विभागात आठ अधिकाऱ्यांची बेकायदेशीर नेमणूक करण्यात आली आहे. या नियुक्त्या करतान आर्थिक व्यवहार झाला असून, संपूर्ण व्यवहार 'शंभर टक्के' पैशात झाला आहे. हे अत्यंत दुर्दैवी आहे. यामुळे जवळपास ३७५ उपविभागीय जलसंधारण अधिकाऱ्यांवर अन्याय झाला असल्याचेही संदीप जोशी म्हणालेत. ते टीव्ही ९ मराठीशी बोलत होते.

जेव्हा शासकीय निर्णय स्पष्ट असतात तेव्हा कुठलातरी मार्ग काढून स्वत:च्या बदल्या करून घेण्याचे काम अधिकारी करतात, हे अत्यंत गंभीर आणि दुर्दैवी आहे, असेही जोशी यांनी म्हटले. तसेच यावर कठोर कारवाई होणं अपेक्षित आहे, अशी अपेक्षाही संदीप जोशी यांनी व्यक्त केली.







# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २३ मे २०२५


## महिला आयोगाकडून दुर्लक्ष झाले असेल तर कारवाई करू - अदिती तटकरेंची प्रतिक्रिया



**मुंबई** : वैष्णवी हगवणे मृत्यू प्रकरणावर राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या नेत्या व मंत्री अदिती तटकरे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. त्या म्हणाल्या की, गेल्या काही महिन्यात कसपटे कुटुंबाने जे काही सहन केले आहे तसेच अजून ज्या कोणत्या बाबी तक्रारीत नमूद करायच्या राहिल्या असतील त्या बाबींचा समावेश करत या केसला अजून कसे मजबूत करता येईल ते बघता येईल. परंतु त्या आधी दोन आरोपी जे फरार आहेत त्यांना तातडीने पोलिसांनी अटक करावी.

पुढे बोलताना अदिती तटकरे म्हणाल्या, दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे ही केस स्ट्रॉंग झाली पाहिजे. त्यासाठी आणखी काही विटनेस असतील किंवा जे इतर लोक असतील की ज्यांना असा अनुभव आला असेल त्यांनी त्यांच्या बाबी समाविष्ट करायला पाहिजे. आरोपींना कठोर शिक्षा कशी करता येईल या दृष्टीने शासनाच्या आणि पोलिसांकडून प्रयत्न केले जातील, असे आश्वासन तटकरे यांनी दिले आहे.

हगवणे यांच्या मोठ्या सुनेने महिला आयोगाकडे तक्रार दाखल केली होती. परंतु काही कारवाई केली गेली नाही. यावर अदिती तटकरे यांना विचारले असता त्या म्हणाल्या, मोठ्या सुनेने जर महिला आयोगाकडे तक्रार केली असेल आणि आयोगाकडून दुर्लक्ष झाले असेल तर त्या संदर्भात सुद्धा योग्य ती कारवाई केली जाईल. कारण कदाचित तेव्हा ६ महिन्यांपूर्वी दक्षता घेतली असती तर एक जिने तक्रार केली आहे तिलाही न्याय मिळाला असता आणि तिचेही अनुभव समोर आले असते. वैष्णवीचे अनुभव आणि मोठ्या सुनेचे अनुभव जवळपास सारखेच आहेत. परंतु मोठ्या सुनेला नवऱ्याची साथ असल्यामुळे सुदैवाने ती सुखरूप आहे. परंतु तक्रार दाखल करूनही दखल घेतली नसेल तर निश्चितच कारवाई केली जाईल.

अदिती तटकरे म्हणाल्या, शेवटी अशा पद्धतीची घटना घडते हे दुर्दैव आहे. आज सत्तेवर कोणीही असो, नीलम गोऱ्हे ताई उपसभापती पदावर आहेत, त्यांचेही काही अधिकार असतात. आयोगाचे काही अधिकार असतात. त्या संदर्भात कुटुंब म्हणून त्या कुटुंबाला न्याय मिळवून देणे हे गरजेचे आहे. आज राज्याचे मुख्यमंत्री असतील ते या घटनेतील प्रत्येक अपडेट घेऊन आहेत. तसेच अजित दादा देखील यात लक्ष घालून आहेत. आमच्या सगळ्यांची ही नैतिक जबाबदारी आहे की या कुटुंबाला न्याय मिळवून देणे. त्यांनी त्यांची लेक गमावली आहे. आम्ही तिला न्याय मिळवून देणार.

पुढे बोलताना अदिती तटकरे म्हणाल्या, ज्या वेळेला शक्ती कायदा तयार करण्यात आला, त्यावेळेला आगल्या बाबींचा समावेश करण्यात आला. केंद्रातले जे काही चांगले बदल करण्यात आले आहेत त्यात पाठपुरावा मुख्यमंत्री करत आहेत. परंतु अशा प्रकारच्या ज्या केसेस आहेत. ६ महिन्यांपूर्वी तक्रार केली होती, पण दखल घेतली गेली नसेल तर गंभीर आहे. पण अशा पद्धतीच्या तक्रार महिला आयोग असेल किंवा गृहविभागाकडे आल्या असतील त्या सगळ्या तक्रारींचा आम्ही तपास करू आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच उपमुख्यमंत्र्यांच्या समोर सादर करू.

वैष्णवी हगवणेचा मृत्यू झाल्यानंतर पोलिसांनी यावर कारवाई करण्यासाठी दिरंगाई केली तसेच वैष्णवीचे बाळ देखील दोन दिवसानंतर कसपटे कुटुंबीयांना मिळाले आहे. हे बाळ देखील अज्ञात व्यक्तीने आणून दिले. यावर बोलताना अदिती तटकरे म्हणाल्या, पोलिसांकडून जर काही हलगर्जीपणा झाला असेल त्यांच्यावर मुख्यमंत्री जे राज्याचे गृहमंत्री देखील आहेत ते बारकाईने लक्ष देत आहेत तसेच ज्या काही टीम त्यांनी नेमल्या आहेत, यात कुठेही काही आढळून आले तर कारवाई केली जाईल.

## ५९ सदस्यांचे शिष्टमंडळ ३३ देशांना देणार भेट



**मुंबई** : ऑपरेशन सिंदूर आणि पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादाबद्दल भारताची भूमिका मांडण्यासाठी केंद्र सरकारने ५९ सदस्यीय शिष्टमंडळाची स्थापन केले आहे. हे शिष्टमंडळ जगातील प्रमुख देशांना, विशेषतः संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या (UNSC) सदस्य देशांना भेट देणार असून तिथे जाऊन पाकिस्तानची पोलखोल करणार आहेत. या शिष्टमंडळाची ७ गटांमध्ये विभागणी करण्यात आली आहे. गट ७ चे नेतृत्व राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे करत आहेत. सुप्रिया सुळेंचा गट इजिप्त, कतार, इथिओपिया आणि दक्षिण आफ्रिका या देशांना भेटी देणार आहे.

याबाबत बोलताना सुप्रिया सुळे म्हणाल्या, आम्हाला एमईए जी ब्रिफिंग देईल, त्यानुसार इतर देशांशी चर्चा केली जाईल. आमच्यावर मोठी जबाबदारी सोपवण्यात आली आहे. आम्ही जे बोलणार आहोत, ते एक जबाबदार भारतीयाप्रमाणे सर्वसोबत मिळून चर्चा करणार आहोत. यासंदर्भात आम्हा ४ गटांना उद्या ब्रिफिंग दिली जाणार आहे. परवा आम्ही जाणार आहोत. परत आल्यानंतर त्यावर सविस्तर बोलता येईल.

भारत नेहमीच शांतता आणि अमन पाहिजे असणारा देश राहिला आहे. हे आमचे संस्कार आहेत. भारत नेहमीच दहशतवादविरुद्ध लढला आहे आणि पुढेही लढत राहील. परदेशात जाणारे आमचे सर्व खासदार शांतता आणि सुव्यवस्थाचा संदेश घेऊन जात आहेत. आपण कालही दहशतवादाच्या विरोधात होतो, आजही आहोत आणि उद्याही राहू. असेही सुप्रिया सुळे म्हणाल्या.

सुप्रिया सुळे यांनी यावेळी पुण्यातील वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरणावरही भाष्य केले. समाज म्हणून आपल्याला काळिमा फासणारी घटना असल्याचे त्या म्हणाल्या. एकाच घरातील दोनही सुना जर पोलीस ठाण्यात जाऊन तक्रार करत असतील, तर एवढे शिक्षण घेऊन हगवणे कुटुंबाने काय केले? असा प्रश्न निर्माण होतो, असे त्यांनी म्हटले. पाश्चिमात्य कपडे घालूनही बुरसटलेले विचार गेलेले नसतील, तर शिक्षणाचा तरी काय उपयोग. हगवणेंच्या घरात काही क्रांती घडलीच नाही, असे वाटते. हगवणे कुटुंबाने पुरोगामी विचारांचा अपमान केला आहे, अशी टीका सुप्रिया सुळे यांनी केली.

हगवणे कुटुंब हे माझ्याच लोकसभा मतदारसंघात मोडते. एक महिन्यापूर्वी त्यांच्या घरातील एका कार्यक्रमाचे आमंत्रण त्यांनी मला दिले होते. मात्र घरातील सुनांनी कौटुंबिक हिंसाचाराची तक्रार दाखल केली असल्याची माहिती मला होती, त्यामुळे मी त्या कार्यक्रमाला जाणे टाळले, असे सुप्रिया सुळे यांनी सांगितले. तसेच या कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री अजित पवारही गेले नव्हते. ते काही वर्षांपूर्वी झालेल्या लग्नाला नक्कीच गेले होते. पण तेव्हा हगवणे कुटुंबाबाबतची माहिती त्यांना नसावी, असेही त्या म्हणाल्या.

बीडमधील संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणी माध्यमांनी शौर्य दाखवत ती बातमी लावून धरली होती. म्हणूनच संतोष देशमुख यांच्या हत्येचा तपास सुरळीत होऊ शकला. त्याप्रमाणेच याही प्रकरणात माध्यमांनी वैष्णवीला न्याय मिळवून देण्यासाठी हे प्रकरण लावून धरावे, असे आवाहन सुप्रिया सुळे यांनी केले. महाराष्ट्र सरकारनेही कडक कारवाई करून कोणत्याही कुटुंबाची सुनेला त्रास देण्याची हिंमत व्हायला नको, असेही त्या म्हणाल्या.


इरफान इनामदार
मो. 8956362639
8087880274
9405109103
E-mail : sahilcomputer05@gmail.com
• डी.टी.पी.जॉब वर्क
• मराठी, हिंदी, इंग्रजी
• एम.फील-पी.एच.डी.,थेसिस
• स्पायरल / हार्ड बाईन्डींग
• लॅमिनेशन
• कलर प्रिंट
साहिल
कॉम्प्युटर्स अँड प्रिंटर्स
विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.
DMLT — कालावधी २ वर्ष, पात्रता : १० वी /१२ वी पास
SANITARY HEALTH INSPECTOR — कालावधी १ वर्ष, पात्रता : १०वी /१२ वी पास
PG RADIOLOGY — कालावधी दिड वर्ष (३ सेमिस्टर), पात्रता : Any B.Sc.
C.T.SCAN — कालावधी १ वर्ष, पात्रता : १० वी १२ वी पास
E.C.G. — कालावधी १ वर्ष, पात्रता : १० वी १२ वी पास
PGDMLT — कालावधी दिड वर्ष (३ सेमिस्टर), पात्रता : B.Sc (Microbiology, chemistry, Botany, Zoology, Biochemistry, MLT, CLS)
X-RAY — कालावधी १ वर्ष, पात्रता : १०वी, १२ वी पास
रेडिओलॉजी — कालावधी २ वर्ष, पात्रता : १२ वी सायन्स पास
फिजिओथेरपी — कालावधी २ वर्ष, पात्रता : १२ वी सायन्स पास
ऑप्थोमेट्री — कालावधी २ वर्ष, पात्रता : १२ वी सायन्स पास
DIALYSIS TECHNICIAN — कालावधी १ वर्ष, पात्रता : १० वी / १२ वी पास
O.T.TECHINICIAN — कालावधी २ वर्ष, पात्रता : १० वी १२ वी पास

ADMISSION OPEN
बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ,पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)
9405109103
8830838903